दलाई लामांच्या
अप्रकाशित व्याख्यानासह
इतर पूज्य लामांच्या उपदेशांचा संग्रह

# बिकमिंग बुद्धा

संपादन
रेणुका सिंग

अनुवाद
शर्वरी जोशी

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Becoming Buddha : Edited by Renuka Singh
Marathi translation by Sharvari Joshi
First published in English by Penguin Ananda, Penguin Books India in 2011
First published in Marathi by Riya Publications in arrangement
with Penguin Books India.

**बिकमिंग बुद्धा :** रेणुका सिंग
अनुवाद : शर्वरी जोशी

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
शर्वरी जोशी

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २१०/-

# बिकमिंग बुद्धा



# प्रस्तावना

तुशिता महायाना मेडिटेशन सेंटरची सुरुवात कशी झाली ते मला आठवते आहे आणि ते मी तुम्हाला सांगितले पाहिजे. माझे गुरू लामा येशे जे भूत, वर्तमान आणि भविष्यातील सर्व बुद्धांपेक्षा अधिक कृपाळू होते, त्यांनी मला आमच्या नेपाळमधील काठमांडू येथील कोपान मोनास्टेरी येथे १९७७ च्या जानेवारी महिन्यात आपण दिल्लीला मेडिटेशन सेंटर सुरू करावे असे सुचवले. लामा असे म्हणाले की, भारतीय लोकांप्रती त्यांना वाटणारी कृतज्ञता व्यक्त करायचा तो एक मार्ग आहे.

भारतीय लोक यांच्या प्रती दयाळू कसे राहिले?

असो, हे एक सत्य बाजूला ठेवू की, महायान शिकवणुकीनुसार सर्व ज्ञानग्रहणशील आत्मे हे दयाळू होते. तिबेटी जनतेला भारतीय जनतेने त्यांच्यावर केलेलं प्रेम माहिती आहे.

या संदर्भात अगदी अलीकडचीच घटना सांगायची झाली तर १९५९ मध्ये तिबेटी लोकांना त्यांनी दिलेला आश्रय जेव्हा आमच्या देशावर कम्युनिस्ट असलेल्या चीनने आक्रमण केले आणि त्यानंतर आम्हाला आमची संस्कृती जपण्याचे, आमच्या धर्मानुसार वागण्याचे आमचे उन्मुक्त स्वातंत्र्य आम्हाला बहाल केले. ही दयाळूपणाची परिसीमा होती, केवळ तिबेटी जनतेसाठीच नव्हे, तर साऱ्या जगासाठी!

भगवान बुद्ध हे भारतात जन्मलेले असल्याने आणि बुद्ध धर्माचे प्रवर्तक असल्याने तिबेटी लोकांसाठी ही 'आर्यभूमी' सदैव पवित्र राहिली आहे. आम्ही भारताचे यासाठीही ऋणी आहोत की, त्यांनी बौद्ध धर्माची शिकवण तिबेटी

जनतेत प्रसारित करण्यासाठी भारतातून बुद्ध धर्माचे जाणकार पाठवून तेथील लोकांना प्रशिक्षित करण्यासाठी आम्हाला मदत केली. त्याचप्रमाणे मूळ संस्कृत भाषेतील बुद्धांच्या शिकवणीचे तिबेटी भाषेत लेखन करण्यासाठीही आम्हाला मदत केली. जो तिबेटी 'बुद्धिझम' आम्ही सांगतो, तो मुळात 'इंडियन बुद्धिझम'च आहे, ज्याला आदरणीय दलाई लामा हे नालंदा परंपरा मानतात. तिबेटमध्ये जर तुम्हाला बुद्धाच्या शिकवणीची सत्यासत्यता पडताळून पाहायची असेल तर त्या शिकवणीचा उगम भारतीय परंपरेतून झाला आहे, हे तुम्हाला सिद्ध करावं लागतं!

नालंदाप्रमाणेच ओदन्तापुरी आणि विक्रमशीला या दोन (भिक्खू) विद्यापीठांनी तिबेटमधील विद्यापीठांना प्रेरणा दिली आहे.

भारतात 'बुद्धिझम' साधारणपणे १५०० वर्षांपूर्वी भरभराटीला आला आणि ज्यावेळी तो परमोच्च स्वरूपात होता, त्यावेळी तो तिबेटमध्ये प्रसारित होण्यास सुरुवात झाली. यानंतर तिबेटमध्ये पाचशे वर्षे जो बुद्धधर्म प्रसारित होत राहिला त्याची तीन प्रमुख अंगे राहिली- हिमायान सूत्र, महायान सूत्र (परामितायान) आणि तंत्र (वज्रायान). ज्यावेळी भारतात बुद्ध धर्म लयास जाऊ लागला (किंबहुना निष्प्रभ केला गेला) त्यावेळी तिबेटमध्ये मात्र जोपर्यंत काही बाह्य आक्रमणांनी हा धर्म लयास पावला नाही तो पर्यंत पुढील हजार वर्षे, ऐन भरात राहिला.

ज्या बौद्ध धर्माचा वारसा भारताकडून तिबेटला मिळाला व तो तिचे जोपासला गेला; त्या बौद्ध धर्माचा अभ्यास आणि अवलंब पुन्हा एकदा भारतीयांना करता यावा, हा उद्देश नजरेसमोर ठेवूनच लामा येशे यांनी तुशिता ध्यान केंद्राची स्थापना करण्याचा निर्णय घेतला.

१९५९ मध्ये चिनी दबावाला आमचा प्रतिकार अयशस्वी ठरल्यानंतर, महान दलाई लामा, त्यांचे दोन प्रशिक्षक क्याबाजे लिङ्ग रीम्पोशी व क्याबाजे त्रिजांग रीम्पोशी, तसेच इतर अनेक श्रेष्ठ लामा व १००० हून अधिक सामान्य तिबेटी नागरिक हे सुरक्षेसाठी भारतात पळून आले आणि त्यांनी आपली शिकवण आणि अनुभव सोबत आणले. भारत सरकारने त्यांच्यासाठी काही सोई सावलती उपलब्ध करून दिल्याने यापैकी बहुतेकजण 'धर्मशाला' इथे

स्थायिक झाले. लामा येशे यांचे रीट्रीट सेंटर इथे आहे तरीही मेडिटेशन सेंटरसाठी त्यांनी दिल्लीची निवड केली, कारण इथे जनसंख्या अधिक आहे आणि वेगवेगळे लोक, शिक्षक, प्रोफेसर्स आणि प्रवासी लोक यांचा इथे सतत राबता असतो.

तुशिता सेंटरच्या निर्मितीसाठी ऑस्ट्रेलियन साधू डॉ. निक रिबुश यांना भारतीय बुद्ध धर्म अभ्यासक सुनीता काकरीया यांच्यासोबत लामा येशे यांनी भारतात पाठवले. सेंटरसाठी सुयोग्य जागा निवडण्यासाठी त्यांना दोन वर्षे लागली आणि शेवटी शांतिनिकेतनच्या उपनगरात १९७९ च्या उन्हाळ्यात तुशिता महायान मेडिटेशन सेंटरची स्थापना झाली. सुरुवातीपासूनच या सेंटरमध्ये हद्दपार केले गेलेले अनेक विद्वान तिबेटी लामा, भारतीय आणि पाश्चिमात्त्य विद्वान यांना येथे व्याख्यानासाठी आमंत्रित केले जाऊन विद्यार्थ्यांना मेडिटेशन व बुद्ध धर्माची शिकवण दिली जाते. यामध्ये महनीय दलाई लामा यांचे दोन प्रशिक्षक सेन्शाब सेरकोंग रीम्पोशी व सोंग रीम्पोशी, गेश राब्टेन, गेश सोपा व गेश धार्गेय यांचा समावेश आहे. लामा येशे यांनी देखील अनेकदा तिथे शिकवले. आम्ही भाग्यवान आहोत की गेलेक रीम्पोशी हे तिथले निवासी (दिल्ली) असल्याने ते तुशिता मध्ये नियमित शिकवायला येत असत.

१९८१ मध्ये लामा येशे यांनी मान्यवर दलाई लामा यांना त्यांना झालेले ज्ञान त्यांनी नियमितपणे कथन करावे आणि तुशिता धर्म उत्सव या निमित्ताने साजरा व्हावा यासाठी आमंत्रित केले. दुर्दैवाने, त्या वर्षी दलाई लामा येऊ शकले नाहीत. त्या वेळचे भारताचे केंद्रीय गृहमंत्री ग्यानी झैलसिंह यांनी लामांच्या निमंत्रणाचा स्वीकार केला आणि एक अत्यंत सुंदर कार्यक्रम ओबेरॉय हॉटेलमध्ये पार पडला. परंतु, त्यानंतर पुढची काही वर्षे महनीय दलाई लामा हे अशोका हॉटेलमधील कार्यशाळांना नियमितपणे उपस्थित राहिले. अनेक पूर्व निर्देशांकांच्या पश्चात डॉ. रेणुका सिंह यांनी तुशिताची निर्देशक म्हणून जबाबदारी घेतली आणि अजूनही त्या महनीय दलाई लामा यांना इथे आमंत्रित करीत असतात.

म्हणूनच तुशितामध्ये ज्या महान लोकांनी प्रवचने दिली, त्यातली सुरुवातीच्या काळातली काही प्रवचने असलेले हे पुस्तक वाचताना आपण आनंदित व्हाल, असे मला वाटते.

लामा थुब्तेन झोप रीम्पोशी
आध्यात्मिक निर्देशक
तुशिता महायाना मेडिटेशन सेंटर

✦✦✦

## परिचय

तर्काच्या साम्राज्याने धर्माला नामोहरम केले तर सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या आजच्या युगाला मात्र धर्मातील चेतनेचा शोध नव्याने घ्यावासा वाटतो आहे. बाजार आणि तंत्रज्ञानाच्या अवाजवी स्तोमाला आता उघड आव्हान दिले जाते आहे आणि काल्पनिक स्वातंत्र्याला कायदेशीर मानले जाते आहे. आधुनिक काळातील मनुष्याच्या मनातली ही धुसफूस त्याला निराशेच्या गर्तेत नेते आहे, कारण बाजारातील वस्तूंचे महत्त्व अधिक वाढत चालले आहे. आत्यंतिक व्यवहारी दृष्टिकोनामुळे सगळं काही मुबलक तेवढं उत्तम इतक्या क्षुद्र विचारांना मानले जाते आहे आणि खोट्या प्रतिष्ठा बनवल्या जात आहेत.

नैतिकतेविषयी कमालीचं गोंधळलेपण, दहशत आणि विनाश, नैसर्गिक स्रोतांची ओरबड, मानसिक आघात यांचा एकत्रित परिणाम हा दुःखात होऊन तो साथीच्या रोगाप्रमाणे पसरतो आहे. याव्यतिरिक्त व्याधी, वृद्धत्व आणि मृत्यू या गोष्टी आहेतच! स्वत्वाच्या खऱ्या आणि सुरक्षित व्यक्तित्त्वाच्या आणि सामाजिक रचना याविषयीच्या अशक्यतेबद्दल लिहिताना डॉ. व्हिलिस हे आधुनिकतेची समीक्षा करताना ती 'अर्थहीन' असल्याचे सांगतात. (डॉ. व्हिलिस हे यांनी हे विचार 'वेस्टर्न बुद्धिझम: सिंम्प्टम ऑफ सेक्युलरायझेशन ऑर डिझायर फॉर पोस्ट सेक्युलर रीएन्चांटमेंट' या आयएसए गोथेनबर्ग, स्वीडन येथे २०१० मध्ये एका पेपरच्या सादरीकरणादरम्यान मांडले.) 'उपभोगवाद आणि भौतिकता यांचे प्राबल्य असलेला नवाच धर्म सध्या विश्वभरात व्यापून राहिला आहे,' असे त्यांनी पी. गुडचाईल्ड (कॅपिटॅलिझम ॲन्ड रिलिजन : द प्राइस ऑफ पीटी, रूटलेज, यू. के. २००२) यांचे विधान पुन्हा मांडले आहे.

सर्वात तातडीने दखल घ्यावी अशी आणि अतिशय महत्त्वाची मूलभूत राजकीय समस्या म्हणजे लोकांना त्यांच्या स्वतःच्या अंतर्मनाची शक्ती आणि

स्वातंत्र्य कसे पुनर्स्थापित करून देता येईल ही आहे. ध्यान किंवा चिंतनाच्या जगात, प्रतिमा, प्रदर्शन आणि झगमगाट यांचा मोठाच अडसर आहे. हे जर अर्थव्यवस्थेशी निगडित असले तर लालसा, वासना आणि महत्त्वाकांक्षा यांची खुशामत यात अधिक दिसते, कारण लोकांच्या मनात एक प्रकारची भीती आहे. तुम्ही जेव्हा ध्यानाच्या जगात असता तेव्हा एकटे पडता, समाजापासून तुटता आणि आपल्याच विचारांमध्ये गुरफटले जाता! जेव्हा तुम्ही यातून बाहेर पडता तेव्हा समाजाच्या सोबत असल्याचा एक भाव तुमच्या मनात असतो. तुम्हाला तुमचे अंतर्मन काय सांगते, याकडे तुमचे मन वळवणे अधिक महत्त्वाचे असते.

बुद्धिझम एक आनंददायी शक्ती म्हणून आज जगात पुढे येत आहे. भारतात बुद्ध धर्म बहरला आणि इसवी सन सातव्या शतकात तिबेटमध्ये त्याचा प्रसार झाला. तिबेटवर जे संकट १९५० साली आले आणि अनेक तिबेटी नागरिकांनी भारतात आश्रय घेतला तेव्हा हा धर्म पुन्हा भारतात परतला. आदरणीय दलाई लामा आणि बौद्ध धर्माचे इतर अभ्यासक आणि शिक्षक हे पुढच्या पिढ्यांना बुद्ध धर्माची शिकवण देत राहिले.

लामा येशे यांच्या म्हणण्यानुसार भारतीयांनी तिबेटी जनतेविषयी जी करुणा आणि औदार्य दर्शवले त्याप्रती कृतज्ञ भावाने तुशिता सेंटरची दिल्लीमध्ये स्थापना करण्यात आली. भारत ही बुद्धाची, तसेच इतर आध्यात्मिक गुरूंची भूमी आहे, आर्यभूमी आहे. तुशिता सेंटरमध्ये प्रज्ञेचा आणि तिच्या संरक्षणाचा अभ्यास केला जातो. बुद्धांनी दर्शवलेला मध्यम मार्ग, जो अहिंसेला महत्त्व देतो असा असल्याने दिल्लीकरांना स्वतःच्या अंतरात वळवण्यासाठी आणि आत्मोन्नतीसाठी जे ध्यानाचे प्रशिक्षण असावे लागते ते येथे मिळते.

लामा थुब्तेन येशे आणि लामा थुब्तेन झोपा रीम्पोशी या दोन लामांच्या प्रयत्नाने हे केंद्र अस्तित्वात आले आहे. हजारो वर्षांपासून बुद्धांचे विचार अनेक लोक आत्मसात करीत असतात; त्याची मूळ सात्त्विक प्रकृती आजही तशीच आहे. हे ज्ञान सतत बदलत जाणारी वास्तविकता (यात सतत बदल होणे अपेक्षित आहे) आणि सर्व जीवमात्रांचे एकमेकांवर अवलंबून असणे यावर भर देते.